# प्रेसनोट

दि.२८/०६/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | संगमनेर शहर पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.५९३/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, ७(अ) व १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)बाबुराव राजाराम गवांदे, वय-७५ वर्ष, सेवानिवृत्त शिक्षक, सध्या सह सेक्रेटरी सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्था, संगमनेर, ता.संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर<br>२)चंद्रभान काशिनाथ मुटकुळे, वय-६२ वर्ष, लेखनिक, सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्था कार्यालय, संगमनेर, ता.संगमनेर जिल्हा अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ३,००,०००/- रुपये तडजोडीअंती २,००,०००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांची शासनातर्फे सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर या संस्थेत २० टक्के अनुदानीत सहाय्यक शिक्षक म्हणुन भाऊसाहेब गुंजाळ पाटील सहयाद्री ज्युनिअर कॉलेज, संगमनेर येथे निवड झाली आहे. सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक या संस्थेचे सह सेक्रेटरी गवांदे यांनी तक्रारदार यांची नियुक्ती शासनातर्फे सह शिक्षक म्हणुन झालेली असतांना देखील त्यांचे भविष्यातील पगारवाढी साठी संस्थेतर्फे आडकाठी निर्माण न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ३ लाख रूपये लाचेची मागणी केलेबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राप्त झाली होती.<br>दि.२७/०६/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान सहयाद्री बहुजन विद्या प्रसारक या संस्थेचे सह सेक्रेटरी आरोपी बाबुराव राजाराम गवांदे यांनी तक्रारदार यांची नियुक्ती शासनातर्फे सह शिक्षक म्हणुन झालेली असतांना देखील तक्रारदार यांचे भविष्यातील पगारवाढी साठी संस्थेतर्फे आडकाठी निर्माण न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष ३ लाख रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती २ लाख रूपयाची मागणी करून सदर लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली. दि.२७/०६/२०२५ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान लाच रकमेपैकी ५०,०००/- रूपये लाच रक्कम प्रथम आरोपी बाबुराव राजाराम गवांदे यांनी स्वत: व त्यानंतर आरोपी चंद्रभान काशिनाथ मुटकुळे यांनी सदरची रक्कम हि लाचेची असल्याचे माहित असुन देखील तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष स्वीकारली. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर